# उत्तरे

# अभ्यास पुस्तिका-३

## १. पाऊस

**प्र. १.** १. पाऊस भरून आला आहे. २. कौलांवर ताशा वाजू लागला. ३. ओली पानं पाचूप्रमाणे दिसतात.
४. रान हिरवीगार आहेत. ५. कौलांवर ताशा तड्तड् तुडूम वाजतो. ६. ढगात गड्गड् गुडूम होते.
७. पाने ओली चिंब झाली आहेत. ८. पाऊस या कवितेचे कवी मंगेश पाडगावकर आहेत.

**प्र. २.** 'पाऊस' कवितेच्या ओळी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातून पूर्ण कराव्यात.

**प्र. ३.** १. प्रस्तुत कवितेत कवी म्हणतात की पावसाच्या वर्षावाने सृष्टी ओली झाली आहे. त्याचबरोबर झाडे, पाने पावसाने ओलीचिंब झाली आहेत. पानावरील दवबिंदू पाचूप्रमाणे चमकत आहेत. पावसाच्या आगमनाने हिरवे रान मोराप्रमाणे नाचू लागले आहेत.

२. कवीने कवितेत पावसाचे सुंदर वर्णन केले आहे. पावसाच्या आगमनाने सारी सृष्टी हिरवीगार झाली आहे. कवी म्हणतात की पाऊस भरून आला आहे व तो वाऱ्याचा हात धरून आला आहे.

**प्र. ४.** १. वर्षा २. मयूर ३. मेघ

**प्र. ५.** १. कवी म्हणतात की पाऊस वाऱ्याचा हात धरून आला आहे, सर्व सृष्टीला त्याने हिरवेगार केले आहे. कौलांवर पावसाचे थेंब ताशाप्रमाणे वाजत आहेत, जणू म्हातारी ढगात दळण दळते असे वाटत आहे. ढगांचा गडगडाट होत आहे. पाने, फुले ओली झाली आहेत. पानावर दवबिंदू पाचूप्रमाणे चमकत आहेत आणि हिरवी राने मोरासारखी नाचू लागली आहेत.

**प्र. ६.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर

**प्र. ७.** १. मागे २. शत्रू ३. कमी

## २. चतुर बकरे

**प्र. १.** १. गावातून नदी वाहत होती. २. फळीवरून एका वेळेस एक जण जाऊ शकत असे. ३. दोन्ही बोकडे पाण्यात पडले.
४. बकऱ्यांनी पूल पार केला. ५. भांडणाचा लाभ न होता नुकसान होते. ६. जंगलात पशु-पक्षी राहत होते.
७. जंगलातील प्राणी जवळच्या रामपूर गावात येत असत.

**प्र. २.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. चूक ६. बरोबर ७. बरोबर

**प्र. ३.** १. एक बकरा खाली बसला आणि दुसरा बकरा उडी मारून पलीकडे गेल्यावर पहिला बकरा उठला. तोही चालू लागला. अशा रीतीने समंजसपणा दाखवून दोघांनीही पूल पार केला.

२. दोन बोकडांना एका तीरावरून दुसऱ्या तीरावर जायचे होते; यावरून दोन्ही बोकड भांडू लागले.

**प्र. ४.** १. बोकड २. लांडगे ३. आवळे

**प्र. ५.** १. फळीचा २. शहाणपणामुळे, आनंदी ३. तुडुंब ४. बोकड

**प्र. ६.** १. वनराजा २. नास्तिक ३. कथालेखक

## ३. रामचे चातुर्य

**प्र. १.** १. रामच्या घराच्या बाजूला एक छोटा डोंगर होता. २. माणूस झाडावर कुऱ्हाडीने मारू लागला.
३. रामने सगळ्यांकडून झाडे लावू असे वचन घेतले. ४. माणसाला पकडून दिल्यामुळे आई-वडिलांना व सगळ्यांना आनंद झाला.
५. सरपंच वन अधिकाऱ्यांना घेऊन डोंगरावर पोहोचले. ६. एक माणूस झाडावर कुऱ्हाड मारतो आहे, ते पाहून रामला वाईट वाटले.
७. शाळेतून आल्यावर राम झाडांना पाणी घालत असे. ८. राम सकाळी अभ्यास करायला बसला.

**प्र. २.** १. सरपंचाला ४. मित्र ३. वन अधिकाऱ्यांना

**प्र. ३.** १. बरोबर २. चूक ३. चूक ४. बरोबर ५. चूक

**प्र. ४.** १. घर २. पाणी ३. शाळा

**प्र. ५.** १. लेखकाने या पाठात झाडाचे महत्व स्पष्ट केले आहे. झाडे आपले मित्र आहेत. ते आपल्याला आनंद देतात. झाडांवर प्रेम केले पाहिजे. ही शिकवण या पाठातून मिळते.

**प्र. ६.** १. मृत्यू २. अनेक ३. लठ्ठ

## ४. एकीचे बळ

**प्र. १.** १. गावाजवळ घनदाट अरण्य होते. २. झाडाजवळ पारधी उभा होता. ३. पारध्याने जाळ्यावर दाणे टाकले.
४. पक्ष्यांनी दाणे टिपून झाल्यावर उडण्याचा प्रयत्न केला. ५. या गोष्टीतून 'एकीचे बळ' कसे महत्वाचे असते ही शिकवण मिळते.
६. पक्ष्यांनी युक्ती केली ते सगळे मिळून जाळ्यासकट उडाले. ७. एकटा पक्षी जाळे घेऊन उडू शकला नसता.

**प्र. २.** १. गाव २. थव्याथव्याने ३. दाणे ४. पारधी

**प्र. ३.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. चूक ५. चूक

**प्र. ४.** १. थव्याने २. युक्ती ३. पक्ष्यांनी

**प्र. ५.** १. एकदा एका पारध्याने जाळे पसरले व त्यावर दाणे टाकले. दाणे खाण्यासाठी अनेक पक्षी आले. दाणे टिपून झाल्यावर ते उडण्याचा प्रयत्न करू लागले; परंतु त्यांचे पाय जाळ्यात अडकले. त्यांनी युक्ती केली. सगळे मिळून जाळ्यासकट उडाले; कारण एकटा पक्षी जाळे घेऊन उडू शकला नसता. सगळ्या पक्ष्यांनी मिळून प्रयत्न केल्यामुळे ते उडू शकले व त्यांनी आपले प्राण वाचवले. यावरून एकीचे बळ फार महत्वाचे असते, हे स्पष्ट होते.

**प्र. ६.** १. पक्षी २. झाड ३. उडणे

## ५. सशाचे कान

**प्र. १.** १. गाढवाचे कान लांब होते. २. फांदीला सशाचे कान बांधणार आहे. ३. माकड पायाशी झोंबू लागले.
४. माकडाला छान झोके मिळाले. ५. गाढव सशाला म्हणाले, "तुझे कान असले कसले. हे बघ माझे कान किती लांब आहेत."
६. फांदीला ससा लोंबू लागला. ७. ससा माकडाला सात वडे देणार होता. ८. ही कविता विंदा करंदीकरांनी लिहिली आहे.

**प्र. २.** कवितेच्या ओळी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकात पाहून लिहाव्यात.

**प्र. ३.** १. ससा गाढवाला म्हणाला. २. ससा माकडाला म्हणाला. ३. माकड सशाला म्हणाले.
४. गाढव सशाला म्हणाले. ५. गाढव सशाला म्हणाले.

**प्र. ४.** १. जननी २. गृह ३. निद्रा

**प्र. ५.** १. चूक २. चूक ३. चूक

**प्र. ६.** १. उघड २. शत्रू ३. लहान

## ६. महात्मा गांधी

**प्र. १.** १. भारतात आल्यावर गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. २. अहिंसा, असहकार, उपोषण या मार्गांचा अवलंब करण्यास शिकवले.
३. पुढच्या शिक्षणासाठी गांधीजी विलायतेत गेले. ४. मिठाच्या कराविरूद्ध लढण्यासाठी गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला.
५. १९४२ साली गांधीजींनी भारत छोडो, चलेजाव या चळवळी सुरू केल्या.
६. गांधीजींची हत्या ३० जानेवारी १९४८ रोजी प्रार्थनासभेत जात असताना झाली.
७. गांधीजींनी इंग्रजांविरूद्ध चलेजाव व भारत छोडो या चळवळी सुरू केल्या.
८. भारतात आल्यावर गांधीजी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन देशभक्त झाले.

**प्र. २.** १. कुष्ठरोग्यांची  २. पंचा  ३. तुरुंगात  ४. राष्ट्रपिता  ५. बापू

**प्र. ३.** १. बरोबर  २. चूक

**प्र. ४.** १. बाबा  २. मैत्रीण  ३. बहीण

**प्र. ५.** १. पं. जवाहरलाल नेहरू आपल्या शोकसंदेशात देशाला उद्‌देशून म्हणाले ''आमच्या जीवनातील प्रकाश नष्ट झाला. सर्वत्र अंधार पसरला आहे. राष्ट्रपिता आमच्यात नाही''

२. इंग्रज सरकारने लादलेल्या मिठाच्या कराविरूद्ध लढण्यासाठी गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला. यालाच 'दांडीयात्रा' असे म्हणतात.

**प्र. ६.** १. झाडे  २. घरे  ३. नद्या

## ७. दसरा

**प्र. १.** १. बंगालमध्ये अश्विन शुद्ध षष्ठीपासून सुरू झालेल्या दुर्गापूजेची सांगता दसऱ्याच्या दिवशी होते.

२. 'ओणम' या सणामध्ये कृषिसंस्कृतीची छाप दिसून येते.  ३. भारतात रक्षाबंधन, दिवाळी, होळी, दसरा इत्यादी सण साजरे केले जातात.

४. आपट्यांच्या पानांना दुसरे नाव 'सोने' आहे.  ५. दसऱ्याच्या दिवशी शारदादेवतेची पूजा करतात.

६. दसरा या दिवशी श्रीखंड, पुरी, बासुंदी, पुरणपोळी असे गोड पदार्थ बनवतात.

७. दसरा या दिवशी देवाला पालखीतून गावाबाहेर नेतात.  ८. कोलकाता शहरात मूर्तीचे विसर्जन नदीमध्ये केले जाते.

**प्र. २.** १. ज्ञानाची  २. आपटा  ३. दहन  ४. रांगोळी  ५. पालखीतून  ६. सोने

**प्र. ३.** १. बरोबर  २. चूक  ३. बरोबर  ४. चूक

**प्र. ४.** १. विळा, सुळा, खिळा, लुळा, खुळा

**प्र. ५.** १. दसरा या दिवशी दारावर तोरण लावतात. घरापुढे रांगोळ्या काढतात. दुपारी श्रीखंड पुरी, बासुंदी, पुरणपोळी असे गोड पदार्थ करतात. सायंकाळी मैदानात रावणाच्या पुतळ्याचे दहन करतात. देवाला आपट्याची पाने वाहतात. लोक एकमेकांच्या घरी जाऊन सोने म्हणून आपट्याची पाने देतात. घरातील बायका लोकांना ओवाळतात. दसरा हा सण आनंदाने साजरा करतात.

**प्र. ६.** १. दिवशी  २. श्रीखंड  ३. आश्विन  ४. प्रसिद्ध

## ८. आपला राष्ट्रध्वज

**प्र. १.** १. कवी पाटीवरती तीन रंगाचे अर्थ शोधून मांडण्यास सांगत आहे.  २. तिरंगी झेंडा प्राणाहून प्रिय आहे.

३. मनातून शांतता हवी आहे.  ४. क्रांतीचा संदेश केशरी रंग देतो.  ५. अशोकचक्रातून प्रगती जाणवते.

६. समृद्धी हिरव्या रंगातून दिसून येते.  ७. शांतता पांढऱ्या रंगातून दिसून येते.  ८. देशाला समृद्धीने नटवायचे आहे.

**प्र. २.** कवितेच्या ओळी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातून लिहाव्यात.

**प्र. ३.** १. राष्ट्रध्वजात तीन रंग असतात. पहिला केशरी रंग जो त्याग, शौर्य आणि क्रांतीचा धडा देतो. दुसरा रंग पांढरा आहे. पांढरा रंग आपल्याला शांततेचा पाठ देतो. तिसरा रंग हिरवा आहे. तो समृद्धीचा पाठ देतो. मधोमध अशोकचक्र आहे. गतीवाचून प्रगती नाही हे चक्रामधून समजते.

**प्र. ४.** १. अविचार  २. अन्याय  ३. अस्वच्छ  ४. जुने

**प्र. ५.** १. केशरी रंग त्याग, शौर्य व क्रांतीचा पाठ देतो. पांढरा रंग मधोमध झळकतो. तो शांततेचा पाठ देतो.

२. कवी म्हणतात की या तीन रंगाचे अर्थ आपण पाटीवर मांडू या. असा आपला राष्ट्रध्वज तिरंगी झेंडा आपल्याला प्राणाहून प्रिय असला पाहिजे.

३. हिरव्या रंगाची एकच आशा आहे. हा रंग समृद्धीचा पाठ देतो. गतीवाचून प्रगती नाही हे चक्रातून आपल्याला कळते.

**प्र. ६.** १. सण  २. राष्ट्र  ३. सबंध  ४. पृथ्वी

## ९. प्राणी संग्रहालयाची सहल

**प्र. १.** १. पक्षी रंगीबेरंगी आहेत.  २. मुले प्राणी संग्रहालयात जाण्यास सकाळी 9 वाजता निघाली.  ३. माकडे उड्या मारत आहेत.

४. ''बरं मी गट पाडते.'' असे रमा म्हणाली.  ५. शिक्षिका मुलांना (विद्यार्थ्यांना) घेऊन सहा वाजता प्राणी संग्रहालयातून निघणार आहे.

६. वाघाच्या पलीकडे सिंह आहे.  ७. मोर छान नाचत आहे.

**प्र. २.** १. गट  २. भूक  ३. सिंह  ४. उड्या  ५. डबा  ६. सुंदर

**प्र. ३.** १. सुधा बाईंना म्हणाली.  २. मुले (विद्यार्थी) बाईंना म्हणाली.  ३. विजू बाईंना म्हणाली.

**प्र. ४.** १. मेघ  २. जननी  ३. सुरेख

**प्र. ५.** १. चूक  २. चूक  ३. बरोबर  ४. चूक

**प्र. ६.** १. कमी  २. अस्वच्छ

## १०. अशी असावी मैत्री

**प्र. १.** १. अजय व विजय अशी दोन मित्रांची नावे होती.  २. विजय गावाला नदीत नाव चालवण्याचे काम करत असे.
३. नावेत पाणी शिरू लागले.  ४. जेव्हा आपण बुडून मरणार हे कळल्यावर अजयला विजयची मैत्री आठवली.
५. एकदा अजय गावी यायला निघाला.  ६. अजयने ओळख न दाखविल्याने विजयला वाईट वाटले.
७. शहरात अजय व्यापार करत होता.

**प्र. २.** १. पाठीवर  २. ज्ञान  ३. पाणी  ४. वादळ  ५. गणित

**प्र. ३.** १. चूक  २. चूक  ३. बरोबर  ४. बरोबर  ५. चूक

**प्र. ४.** १. सिंहीण  २. मैत्रीण  ३. तरुणी  ४. सुतारीण  ५. गाय  ६. राणी  ७. वडील  ८. बहीण

**प्र. ५.** १. विजय अजयला म्हणाला.  २. अजय विजयला म्हणाला.

## ११. झाडे लावूया

**प्र. १.** १. कवी एक झाड लावणार आहे.  २. कवी मोठे झाल्यावर गोड फळे चाखणार आहे.  ३. कुंपण झाडाभोवती करायचे आहे.
४. कवी झाडाला पाहता-पाहता व त्यांची गाणी गाता-गाता मोठे होणार आहे.  ५. कवितेचे कवी अनंत भावे हे आहेत.
६. कवी मोठे झाल्यावर फुले ओंजळीत भरणार आहेत.  ७. कवी झाडाची निगा राखणार आहे.

**प्र. २.** कवितेच्या ओळी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकात पाहून पूर्ण कराव्यात.

**प्र. ३.** कवीने या कवितेत झाडे लावण्याचे फायदे सांगितले आहेत. एक झाड लावले व त्याला पाणी घातले की ते मोठे होईल, मग त्या सावलीत आपल्याला खेळता येईल. ते मोठे झाल्यावर भरभरून फुले देईल व फळे देईल.

**प्र. ४.** १. वृक्ष  २. जल  ३. पुष्प

**प्र. ५.** १. कवी म्हणतात की मित्रा एक झाड लावू, त्याला रोज पाहू व त्याची गाणी गाता-गाता आपण मोठे होऊ.
२. एक झाड लावूया त्याला कुंपण घालूया. जेव्हा ते कलाकलाने झाड मोठे होईल तेव्हा झाडांना फुले येतील. अशी फुले आपण ओंजळीत भरून घेऊ.
३. एक झाड लावूया, त्याची निगा राखूया व मोठे झाल्यावर त्या झाडाची गोड फळे खाऊया.

**प्र. ६.** १. जुने  २. मागे  ३. उत्तर

## १२. दानशूर कर्ण

**प्र. १.** १. अर्जुन व श्रीकृष्ण एकमेकांशी चर्चा करत होते.  २. धर्मराजाने सेवकांना लाकडे आणायला पाठवले.
३. श्रीकृष्ण व अर्जुन उदारतेविषयी बोलत होते.  ४. श्रीकृष्णाने कर्णाची स्तुती केली.
५. अर्जुनाला कर्णाची उदारता कळली.  ६. दोन शेर लाकडे मिळाली.

**प्र. २.** १. कर्णाची  २. लाकडे  ३. याचक  ४. कार्य  ५. धर्मराजा

**प्र. ३.** १. बरोबर  २. चूक  ३. बरोबर

**प्र. ४.** १. गाय  २. सावकारीण  ३. बहीण  ४. बाबा  ५. आजोबा

**प्र. ५.** १. कर्ण श्रीकृष्णास म्हणाला. २. धर्मराजा श्रीकृष्णाला म्हणाले. ३. कर्ण श्रीकृष्णाला म्हणाला.

**प्र. ६.** १. कर्णाकडे लाकडे मागितल्यावर त्यांनी कुऱ्हाडीने महालाची दारे, खिडक्या, पलंग, आसने अशा चंदनी वस्तू तोडून लाकडांची रास केली.

**प्र. ७.** १. राम हा उदार मनाचा होता. २. मी नवीन पेनाची रास केली.

## १३. आमची मुंबई

**प्र. १.** १. 'मुंबई' नाव मुंबादेवीच्या नावावरून पडले. २. मुंबईत मराठी, हिंदी, इंग्रजी, कोकणी या भाषा बोलल्या जातात.

३. मुंबईत क्रिकेट खेळ लोकप्रिय आहे. ४. माऊंटमेरी चर्चचा इतिहास ३०० वर्षे जुना आहे.

५. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. भारतातील सर्वात जास्त लोकसंख्या मुंबईत आहे. मुंबई जगातील पाचवे मोठे शहर आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी आहे. मुंबईत बॉलीवूड व मराठी उद्योगाचे केंद्र आहे.

**प्र. २.** १. राष्ट्र २. मेघ

**प्र. ३.** १. Temple २. Business

**प्र. ४.** १. कार्यालये २. गल्ल्या

**प्र. ५.** १. कुत्री २. माकडीण

**प्र. ६.** १. सिद्धिविनायक मंदिर मुंबईतील प्रसिद्ध मंदिर आहे. हे सुमारे पावणे दोनशे वर्षांपूर्वीचे असल्याचा उल्लेख धार्मिक ग्रंथात सापडतो.

२. महालक्ष्मी मंदिर हे मुंबईतील प्रसिद्ध मंदिर आहे. इ.स. १४३१ ला एका हिंदू व्यापाऱ्याने या मंदिराचे पुनर्निर्माण केले.

३. बांद्रा पश्चिमेस असलेले माऊंट मेरी चर्च म्हणजे मुंबईतील सर्वात प्रसिद्ध अशा प्रार्थनास्थळांपैकी एक आहे. या चर्चचा इतिहास ३00 वर्षे जुना आहे.

**प्र. ७.** १. प्रार्थना २. उल्लेख

**प्र. ८.** १. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. २. मुंबईत अनेक संग्रहालये आहेत. ३. मुंबईत अनेक प्रसिद्ध मंदिरे आहेत.

## १४. गुरुपौर्णिमा

**प्र. १.** १. गुरुपौर्णिमा गुरू पूजनाचा दिवस आहे.

२. गुरूंचे पूजन मठात, देवळात, आश्रमात, शाळेत, महाविद्यालयात, गुरुकुलात केले जाते.

३. शालेय जीवनात शिक्षक ज्ञान, कला, विज्ञान ह्यांचे धडे देतात. ४. गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा दिवस गुरुपौर्णिमा हा होय.

५. नवजात बालकावर पिता संस्कार घडवतो. ६. शालेय जीवनात शिक्षक - शिक्षिका ज्ञान देतात.

**प्र. २.** १. मंदिर २. नमस्कार ३. वंदनीय

**प्र. ३.** १. कमी २. अपूर्ण

**प्र. ४.** १. रांगा २. आसने

**प्र. ५.** १. आचार्य २. शास्त्रज्ञ ३. सर्वश्रेष्ठ

प्र. ६. १. भारतीय संस्कृतीमध्ये देवता यांना जितके महत्त्व आहे. तेवढेच महत्त्व गुरू आणि सद्‌गुरु यांना आहे. मानवी जीवनातल्या जडणघडणीमध्ये गुरूंचे स्थान हे अनन्यसाधारण आहे. गुरूंमुळे आपल्या जीवनाला आकार मिळतो.

२. जनक-याज्ञवल्क्य, कृष्ण सुदामा-सांदिपनी, विश्वामित्र-राम व लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन अशी गुरू-शिष्य परंपरा आहे.

**प्र. ७.** १. Teacher २. New Born Baby

**प्र. ८.** १. चूक २. बरोबर ३. बरोबर

**प्र. ९.** १. आपण मोठ्या माणसांचा नेहमीच आदर केला पाहिजे. २. शालेय समारंभाला मुख्याध्यापिकांनी पाहुण्यांचे स्वागत केले.